Notes : 1. The above is an extract of the detailed format of Standalone and Consolidated Unaudited Financial Results for the half year ended 30th September 2025 filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Financial Results are available on the Bombay Stock Exchange website(www.bseindia.com) and on the Company's website (www.kgdenim.com) 2. The above financial results have been reviewed and recommended by the Audit Committee and approved by the Board of Directors at their respective meetings held on 14th November 2025 and subject to limited review by the Statutory Auditor of the Company. 3. The results have been prepared in accordance with the Companies (Indian Accounting Standards) Rules, 2015 (Ind AS) prescribed under Section 133 of the Companies Act, 2013 and other recognised accounting practices and policies to the extent applicable. 4. The Company has successfully implemented the State Level Banker's Committee restructuring package as per RBI Master Directions on Natural Calamities. However, The South Indian Bank Limited, one of the consortium lenders holding 7%, and one NBFC to whom Rs.6.50 Crore is outstanding as on date have dissented from the restructuring scheme. Company had preferred writ petitions before Hon'ble High court of Madras which had directed that the Company file complaints before RBI Ombudsman which shall pass suitable orders within 8 weeks from the date of compliant. On filing such complaints hearings have been held and matter is pending. 5. The Company had proposed to issue of warrants convertible into equity shares through preferential issue pursuant to Chapter V of SEBI (Issue of Capital and Disclosure Requirements) Regulations, 2018. Approval from BSE Limited was received and allotment will be made soon. 6. The Company had also proposed to issue of 6% Non-convertible Cumulative Redeemable Preference Shares through private placement under the Companies Act, 2013. Allotment would be made before September 2026. 7. The Company has total Trade Creditors of Rs.7098 Lakh as on 30.09.2025. Some of these trade creditors have issued notices for recovery of their outstanding dues as on 30.09.2025 amounting to Rs. 942 lakh. The Company is negotiating with such creditors for amicable settlements and some settlements have already been made. The Company submitted schedule of payment to be made to pending creditors who have approached NCLT. 8. The figures for the previous periods have been re-grouped /re-arranged wherever necessary to make them comparable with those of current period.

For K G DENIM LIMITED
Sd/- **KG BAALAKRISHNAN**
EXECUTIVE CHAIRMAN, DIN : 00002174

Place : Coimbatore
Date : 14th November 2025

हस्ती ग्रुप ऑफ स्कूल्स येथे बाल दिन उत्साहात साजरा प्रवेशद्वारापासूनच केले विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

दोंडाईचा, दि.१५- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित, हस्ती पब्लिक स्कूल व ज्यू. कॉलेज ,हस्ती वर्ल्ड स्कूल व हस्ती गुरुकुल दाऊळ शिवार दोंडाईचा येथे दिनांक नोव्हेंबर वार शुक्रवार रोजी स्वतंत्र भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त हस्ती ग्रुप ऑफ स्कूल्सचे चेअरमन कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाने बाल दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

हस्ती स्कूलच्या मध्यवर्ती प्रांगणात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन हस्ती स्कूलच्या तीनही शाखांचे हेड बॉय व हेड गर्ल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी हस्ती ग्रुप ऑफ स्कूल्स चे सर्व प्राचार्य, उपप्राचार्या, समन्वयक , शिक्षक व कर्मचारीवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रणव जाधव व यशस्वी रगडे या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून बाल दिनाची माहिती दिली. मुलांचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी प्रवेशद्वारापासूनच बलून व चित्रीकरणाने सजवलेले गेट, आकर्षक रांगोळी, विविध सेल्फी पॉईंट्स सजवण्यात आले होते. तसेच मध्यंतरी विद्यार्थ्यांनी भेळ, पॉपकॉर्न, पॉपिन्स अशा आवडत्या खाऊचाही आनंद लुटला. बाल दिनाचे औचित्य साधत विद्यार्थ्यांनी शाळेतील क्रीडा विभागामार्फत आयोजित कीक क्रिकेट बॉलिंग, बलून फोडणे, पिरॅमिड थ्रो, रिंग फेकणे, कोण गोळा करणे असे विविध मनोरंजक व गंमतीदार खेळ खेळले. विद्यार्थी व शिक्षकांदरम्यान क्रिकेट सामन्याचे ही आयोजन करण्यात आले. तसेच इयत्ता पहिली ते दुसरीच्या विद्यार्थ्यांकरीता रॅम्प वॉक, तिसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांकरीता टॅलेंट शो, सर्व विद्यार्थ्यांकरीता मॅजिक शो आयोजित केला. दरम्यान विद्यार्थ्यांनी कुतूहलाने पहात टाळ्यांनी भरभरून दाद दिली. बाल दिनानिमित्त सर्व विद्यार्थ्यांचे भूत रूम आकर्षणाचे केंद्र ठरले. या ठिकाणी विद्यार्थ्यांनी भूताचा थरार अनुभवत त्याचा आनंद आपल्या मनोगतातून व्यक्त केला. शेवटी विद्यार्थ्यांनी सामूहिक नृत्य केले. बालकांचा आनंद द्विगुणित व अविस्मरणीय बनवण्यासाठी हस्ती ग्रुप ऑफ स्कूलच्या सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

पोलीस दलातर्फे विविध शाळांमध्ये जनजागृती अभियान

धुळे, दि.१५- पोलीस अधीक्षक, धुळे यांच्या मार्गदर्शनाखाली दामिनी पथक, पोलीस अधीक्षक कार्यालय धुळे आणि महिला व बाल विकास कार्यालय, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये महिला सक्षमीकरण या विषयावर व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात आले.

दिवंगत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती व बाल दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांना बालकांवरील अत्याचार प्रतिबंध, हुंडा विरोधी जनजागृती, महिलांवरील गुन्हे व त्यावरील कायदेशीर तरतुदी, सायबर सुरक्षा, तसेच स्वसंरक्षणाचे महत्व अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. दामिनी पथकातील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सुरक्षित वातावरण निर्मितीसाठी आवश्यक उपाययोजना, मदत उपाय व कायदेशीर सहाय्याबाबत सविस्तर माहिती दिली. या जनजागृती अभियानास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून महिला सक्षमीकरणाबाबत जागरूकता वाढविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालयात भगवान बिरसा मुंडा जन्मशताब्दी निमित्त जनजाती पंधरवाडा साजरा

शिरपूर, दि.१५-शहरातील आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भगवान बिरसा मुंडा यांच्या जन्मशताब्दी निमित्त दि.१ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत जनजाती गौरव पंधरवडा साजरा करण्यात येत आहे.

भारत सरकारने १५ नोव्हेंबर हा दिवस, देशाचे आदर्श स्वातंत्र्यसैनिक आणि आदिवासी नेते भगवान बिरसा मुंडा यांचा जन्मदिवस, सर्व आदिवासी स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान करण्यासाठी आणि स्वातंत्र्य लढ्यात आणि सांस्कृतिक वारसामध्ये त्यांच्या योगदानाचे स्मरण करण्यासाठी आणि त्यांची प्रशंसा करण्यासाठी जनजाती गौरव दिवस म्हणून घोषित केला आहे.त्या अनुषंगाने प्राचार्य पी.आर.साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यात आदिवासी संस्कृती पोशाख स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, आदिवासी नृत्य सादरीकरण स्पर्धा, गीत गायन स्पर्धा, बिरसा मुंडा यांच्या जीवनावर आधारित नाट्य सादरीकरण स्पर्धा, आदिवासी पाककृती व सामुदायिक भोजन कार्यक्रम, आदिवासी भिंत कला, जनजातीय परिसंवाद कार्यक्रम आयोजन करण्यात आले. जनजाती पंधरवाडा यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक व्ही. बी. चौधरी, कला शिक्षक एम. व्ही. पावरा, बी.जे. गायकवाड, पी. एस. पाटील, सर्व शिक्षक यांनी प्रयत्न केले.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस, संबंधीतांना, बँकांना, पतसंस्थांना, वित्तीय संस्थांना, स्थावर मिळकत, विकसित करणाऱ्यांना आणि स्थावर मिळकतीचे खरेदी विक्री व्यवहार करणाऱ्या फर्म व व्यक्तींना सदर जाहीर नोटीसीनुसार कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- अ) मौजे जैताणे पो. तु. ता साक्री, तु. जि. धुळे, जैताणे शिवारातील गट नं. १८८ क्षेत्र हे. १.३८ आर. पो. खराब हे. ०.११ आर. एकूण क्षेत्र हे. १.४९ आर. आकार रु. १.५५ पैसे. ब) मौजे जैताणे पो. तु. ता साक्री, तु. जि. धुळे, जैताणे शिवारातील गट नं. १८९/१ क्षेत्र हे. ०.३० आर. पो. खराब हे. ०.०४ आर. एकूण क्षेत्र हे. ०.३४ आर. आकार रु. ०.३५ पैसे. क) मौजे जैताणे पो. तु. ता. साक्री, तु. जि. धुळे, जैताणे शिवारातील गट नं. १९१ क्षेत्र हे. ०.५४ आर. पो. खराब हे. ०.०० आर. एकूण क्षेत्र हे. ०.५४ आर. आकार रु. ०.६० पैसे. ड) मौजे जैताणे पो. तु. ता साक्री, तु. जि. धुळे, जैताणे शिवारातील गट नं. १९२ क्षेत्र हे. ०.२९ आर. पो. खराब हे. ०.०४ आर. एकूण क्षेत्र हे. ०.३३ आर. आकार रु. ०.३५ पैसे. इ) मौजे जैताणे पो. तु. ता साक्री, तु. जि. धुळे, जैताणे शिवारातील गट नं. १९४ क्षेत्र हे. २.१८ आर. पो. खराब हे. ०.२८ आर. एकूण क्षेत्र हे. २.४६ आर. आकार रु. २.५० पैसे. ई) मौजे जैताणे पो. तु. ता साक्री, तु. जि. धुळे, जैताणे शिवारातील गट नं. २२० क्षेत्र हे. ०.१९ आर. पो. खराब हे. ०.० आर. एकूण क्षेत्र हे. ०.१९ आर. आकार रु. ०.३५ पैसे. फ) मौजे रोजगाव पो. तु. ता साक्री, तु. जि. धुळे, रोजगांव शिवारातील गट नं. १५२/१ क्षेत्र हे. १.६९ आर. आकार रु. ०.८० पैसे. ग) मौजे आखाडे पो. तु. ता साक्री, तु. जि. धुळे, आखाडे शिवारातील गट नं. ३७८/१ क्षेत्र हे. २.०९ आर. आकार रु. ०.८५ पैसे. च) मौजे रोजगांव पो. तु. ता. साक्री, तु. जि. धुळे, रोजगांव शिवारातील गट नं. १५२/१/२ क्षेत्र हे. १.६९ आर. एकूण क्षेत्र हे १.६९ आर. आकार रु. ०.८५ पैसे. छ) मौजे जैताणे पो. तु. ता. साक्री, तु. जि. धुळे, जैताणे शिवारातील गट नं. १३५ क्षेत्र हे. १.०० आर. पोट खराब हे. ०.६५ आर एकूण क्षेत्र हे. १.६५ आर. आकार रु. ०.८५ पैसे. ज) मौजे जैताणे पो. तु. ता साक्री, तु. जि. धुळे, जैताणे ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता क्र. १०२ ही बांधीव मिळकत. झ) मौजे जैताणे पो. तु. ता.साक्री तु. जि. धुळे जैताणे ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता क्र. ८४५ ही बांधीव मिळकत, त) मौजे जैताणे पो. तु.ता. साक्री तु. जि. धुळे जैताणे ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता क्र. २२२ ही बांधीव मिळकत, वरील नमूद सर्व मिळकतीच्या चतु:सिमा प्रत्यक्ष परिस्थितीनुसार व गाव नकाशा प्रमाणे.

उपरोक्त चतु:सिमेतील मिळकत ही आमचे अशिल जितेंद्र अशोक महाजन(माळी) मौजे जैताणे ता. साक्री जि. धुळे यांची वडिलोपार्जित मालकीच्या व कब्जे उपभोगातील मिळकती असून त्यांनी सदर मिळकतीच्या अनुषंगाने धुळे येथील मे. सिव्हील जज्ज सो. व स्तर यांचे कोर्टात स्पे. मु. नं. १४१/२०२५ वाटणीसाठी आणि निरंतरच्या मनाई हुकूमासाठी १) हिलाल नागो माळी, २) अशोक हिलाल माळी,३) शामराव हिलाल माळी,४) संगीता शेखर खैरनार (माळी), ५) ललीता राजेंद्र बोरसे (माळी), ६) दिलीप मालजी महाजन (माळी), ७) जिवन मालजी महाजन (माळी), ८) मोहन मालजी महाजन (माळी), ९) प्रमिला गुलाब माळी, १०) अरुणा राजेंद्र खलाणे (माळी), ११) भटाबाई नामदेव सोनवणे (माळी),१२) रुक्मीणीबाई वेडू माळी, १३) रविंद्र उर्फ अनिल वेडू महाजन (माळी), १४) इंदिरा रमेश अहिरे (माळी), १५) संगीता राजेश खैरनार (माळी), १६) फुलाबाई अरुण पाटकरी,१७) गणेश वेडू महाजन (माळी),यांचे विरुद्ध दाखल केलेला आहे.

सदर सर्व शेतमिळकतीमध्ये आमचे अशिल आणि हिलाल नागो माळी यांचे मुलांचा प्रत्यक्ष कब्जे उपभोग व ताबा आहे. सदर बाब सदर नोटीसीत नमूद केलेले इसमांना देखील मान्य व कबूल आहे. सदरचा दावा न्यायलयीन असतांना व सदर मिळकती संदर्भात न्यायलयीन वाद चालू असतांना सदर मिळकती संदर्भात सदरचे दाव्यामध्ये अडचणी व अडथळे आणण्याचे गैरहेतुने सदर मिळकती हस्तांतरीत करण्याचा तथा त्रयस्ताचे हक्क प्रस्थापित करण्याचा बेकायदेशीर प्रयत्न करण्याचे तयारीत सदर दाव्यातील प्रतिवादी असल्याचे कळते. त्यामुळे सदर मिळकती संदर्भात न्यायलयीन वाद सुरु असल्याने कोणाची फसवणूकहोवू नये या शुद्ध हेतुने सदरची जाहीर नोटीस आमचे अशिल देत आहे.

सबब सदर मिळकती संदर्भात सदर जाहीर नोटीसीमध्ये नमूद असलेले लोकांविरुद्ध दावा न्यायाधीन असल्याने कोणीही त्यांचेशी कोणीही खरेदी-विक्री, करार-मदार, सौदे करार, गहाण, तारण, भाडे, करार, टांच, बोजा, जप्ती इत्यादी स्वरूपाचा कोणताही हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. याही उपर कोणीही दाखविल्यास तो आमचे अशिलावर, सदर मिळकतीवर, आमचे अशिलांचे एकत्र हिंदू कुटुंबातील सदर मिळकतीवर आणि सदर मिळकतीमधील आमचे अशिलांचे अविभाज्य हिस्स्यावर आणि स्पे. मु.नं. १४१/२०२५ वर बंधनकारक राहणार नाही.याची नोंद घ्यावी. कळावे.

जाहीर नोटीस देणार :- **जितेंद्र अशोक महाजन (माळी)**

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहितीवरुन आणि दिलेल्या अधिकारावरुन आमचे मार्फत वर्तमानपत्रात प्रसिद्धीस दिली असे. धुळे, दि. १५/११/२०२५

ॲड.निशा भिकन चाळसे मो.७९७२८४८४२६

दिघे ॲडव्होकेट चेंबर्स, जिल्हा न्यायालय जवळ, स्टेशन रोड,धुळे

जाहीर नोटीस

यादृारे तमाम जनतेस, सर्व बँका, सर्व वित्तीय पतसंस्था, सावकार व इतर यांना कळविण्यात येते की,

तु. जि. धुळे, पो. तु. ता. धुळे, येथील मौजे धुळे सिटी सर्व्हे नं. १७४८६ त्यासी क्षेत्र ८८.८० चौ. मी. त्यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ४४.४ चौ.मी. (सर्व्हे नं. ४३१ पैकी प्लॉटनं. ८८ ते ९८ पैकी सब प्लॉट नं. २८ त्यासी क्षेत्र ८९.२३ चौ. मी. त्यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ४४.६१ चौ. मी.) ही मिळकत त्यासी चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस : ओपन स्पेस — पश्चिमेस : रोड,
दक्षिणेस : याच प्लॉट नं.२८ चा उर्वरित भाग — उत्तर : सब प्लॉट नं. २७

येणे प्रमाणे वर्णनांचे आतील मिळकती माझे म्हणजेच **फरुजाना बी. मुश्ताक पिंजारी** यांच्या मालकी हक्काची ताबे उपभोगातील आहे. सदर मिळकतीचे पूर्वीचे मालक १) **अब्दुल मजिद मुनालगिर व हजराबानो मोहंमद अर्शद अन्सारी** यांचेत झालेला मुळ/अस्सल खरेदीखत दस्त क्र. ३७८९/२००० दि. १३/०८/२००० रोजीचे खरेदी खत अस्सल पावतीसह गहाळ झाले,हरविले आहे.

तरी सदर **फरुजाना बी मुश्ताक पिंजारी** हे. डी. सी. बी. बँक, शाखा धुळे यांचेकडून कर्ज घेत असून, सदर मिळकतीबाबत कोणाचीही कुठल्याही प्रकारची हरकत किंवा सदर मिळकती ही कोणत्याही वित्तीय संस्था अगर सावकार तसेच कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, जप्ती, टांच, वारस, बक्षिस, बोजा, सौदा, इ. असल्यास १५ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष हरकती सोबत योग्य तो कागदोपत्री पुरावा सादर करुन शहानिशा करुन द्यावी. टपाल व फोनवर तसेच वर्तमानपत्रात घेतलेली परस्पर हरकत मान्य होणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास मिळकत निर्बोज आहे असे समजले जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

कळावे. प्रस्तुतची जाहीर नोटीस अशिलांनी दिलेल्या माहिती, हजर केलेले दस्त व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. १५/११/२०२५

ॲड. कमलेश राजेंद्र मोरे मो. नं. ९९२३४९०४६९

२८,बडगुजर प्लॉट, पारोळा रोड, धुळे ४२४००१

जाहीर नोटीस

तमाम लोकांस, सर्व संबंधितांस आमचे अशिल श्रीमती हिना सुनील बाफना रा. धुळे यांनी दिलेल्या माहितीवरुन त्यांचे वतीने सदरहू नोटीसीने कळविण्यात येते की,

म.विशेष वसुली अधिकारी, दि. मर्चंट को-ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड धुळे (अवसायनात) यांनी दि. १६/१०/२०२५ रोजीच्या दैनिक आपला महाराष्ट्र वृत्तपत्राचे अंकात प्रसिद्धीस दिलेल्या मौजे लळींग ताो. जि. धुळे येथील गट नं. १/१ पैकी २ हे. ७३ आर क्षेत्राच्या मिळकतीच्या स्थावर मालमत्ता जाहीर लिलाव उद्घोषणेच्या नोटीशीस अनुसरुन आमचे अशिलांनी दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या दैनिक आपला महाराष्ट्र वृत्तपत्रातून जाहीर नोटीस प्रसिद्ध करुन सदर उद्घोषणेच्या नोटीशीप्रमाणे कोणीही सदर स्थावर मिळकतीच्या लिलावात भाग घेऊ नये, त्या प्रक्रियेत सहभाग घेतल्यास होणाऱ्या परिणामास तेच जबाबदार राहतील याची संबंधितांनी नोंद घेण्याचे कळविलेले होते व आहे.

आमचे अशिलांनी प्रसिद्ध दिलेल्या नोटीशीप्रमाणे मौजे लळींग ताो. जि.धुळे येथील गट नं. १/१ पैकी २ हे. ७३ आर. क्षेत्राच्या जमीनीची मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था धुळे यांनी मंजूर केलेल्या अपसेट प्राईसच्या आदेशाविरुद्ध आमचे अशिलांनी मा. सह विभागीय निबंधक साहेब, सहकारी संस्था नाशिक विभाग नाशिक यांचेकडे रिव्हीजन अर्ज दाखल केले असून ते न्यायप्रविष्ट असल्याची देखील सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. कळावे. धुळे दि. १५/११/२०२५

ॲड.अे.एम.देसर्डा, ☎(०२५६२)२४०४०७

१७६३, ग. नं. २,धुळे - ४२४००१

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

मौजे शिरपूर बुद्रुक तालुका शिरपूर जिल्हा धुळे शिवारातील शिरपूर वरवाडे नगर परिषद हद्दीतील बिनशेती सर्व्हे क्रमांक ९/२अ/१ मधील प्लॉट क्रमांक २ यांचे एकूण क्षेत्रफळ ३४५.०० चौरस मीटर पैकी उत्तरे कडील भाग क्षेत्र १७२.५० चौरस मीटर येणे प्रमाणे वर्णनाची रहिवाशी बखळ प्लॉट मिळकत चंद्रशेखर सुधाकर चव्हाण व सिध्देस चंद्रशेखर चव्हाण यांच्या नावे मालकी हक्काने असून, त्यांच्या प्रत्यक्ष ताबे उपभोगातील मिळकत आहे.

आमचे अशिल यांनी कायमस्वरूपी मालकी हक्काने वरनमूद रहिवाशी बखळ प्लॉट मिळकत विकत घेण्याचा सौदा केलेला असून, लवकरच नोंदणीकृत खरेदीखत करणार आहेत.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणत्याही कोर्टात वाद असेल, कोणाचा गहाण, सौदा करार, खरेदी-विक्री करार, टाच, बक्षीस, बोजा, लिज, मुखत्यार वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत खालील पत्यावर मिळकती संबंधित पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरच्या हरकती आमचे अशिलावर तसेच वरनमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाहीत. तसेच मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्बोज समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगण्यावरून आमच्या मार्फत प्रसिद्धीस दिली असे. **दिनांक-१४/११/२०२५**

ॲड.प्रदिप युवराज राजपूत, शिरपूर, जि.धुळे. **मो.नं.९६३७२३१९०१**

ॲड.हर्षल भा. अहिरराव

जाहीर संमन्स

शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनिअर डिव्हीजन यांचे न्यायालयात

दिवाणी कि.अर्ज नं.४०३/२०२५

श्रीमती.विमलबाई राजधर पाटील वगैरे-२ ..... **अर्जदार**

विरूध्द

कै.बुधा कौतिक पाटील ..... **मयत**

वारस दाखला **(Heirship Certificate)** मिळणेसाठी अर्ज

ज्या अर्थी अर्जदार क्र.१अ) श्रीमती विमलबाई राजधर पाटील ही सून या नात्याने अर्जदार क्र. १ब) खुशाल राजधर निकम हा नातु या नात्यांने, तसेच अर्जदार क्र.२ श्री.निंबा बुधा निकम हा मुलगा या नात्याने मयत कै.बुधा कौतिक पाटील यांचे वारस असल्याने मयताचे मृत्यु पश्चात वारस दाखला मिळणेसाठी अर्ज सादर केलेला आहे. कै.राजधर बुधा पाटील हे मयत असून मयताचे अनुक्रमे अर्जदार क्र १अ ते २ हे सून, नातु, व मुलगा आहे त्याशिवाय दुसरे कोणीही वारस नाही. असे त्याचे कथन आहे. मयत कै.बुधा कौतिक पाटील हे दि.०५/१२/१९८५ रोजी मौजे हातनुर ता.शिंदखेडा जि.धुळे येथे मयत झालेल असून मयत कै.बुधा कौतिक पाटील यांचे नावालाशासकीय, प्रशासकीय, महसुल तसेच इतर महत्त्वाचे कामासाठी नावे लागणेकामी अर्जदार क्र.१अ ते २ हे वारस म्हणून नाव लावण्यासाठी वारस दाखला दाखल केलेला आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस या जाहिर संमन्स द्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जाचे कामी सुनावणी तारीख १८/१२/२०२५ ठेवण्यात आली आहे. तरी या न्यायालयात वरील वारस दाखला देण्याबाबत कोणाची हरकत असल्यास इतर हितसंबंध असल्यास या न्यायालयात दि.१८/१२/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून आपले म्हणणे सादर करावे. वरील तारखेस व वेळी कोणाची हरकत न आल्यास निर्णय देण्यात येईल. मग नंतर काही एक तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर संमन्स नोटीस न्यायालयाचे सही शिक्क्यानिशी दिली असे.

शिंदखेडा, दि.११/११/२०२५

कोर्टाचा शिक्का — **सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, कनिष्ठस्तर शिंदखेडा

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे महिंदळे ता. जि.धुळे येथील गट नंबर १०६/२/ड पैकी प्लॉट नं.२३ चे एकूण क्षेत्र १७२.५० चौ.मी. बखळ प्लॉट.

यासी चतु:सिमा : -

पुर्वेस : प्लॉट नं.२४ — पश्चिमेस : प्लॉट नं.२२
दक्षिणेस : रस्ता — उत्तरेस : प्लॉट नं. २८

येणे प्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक **श्री. गिरीश प्रभुदयाल अग्रवाल** रा. ७, अग्रवाल नगर,मालेगांव रोड,धुळे, श्री. किशोर हरकचंद भंडारी रा. ३५५२ चंपा बाग साक्री रोड,धुळे. श्री. प्रविण महावीर अग्रवाल रा. भाईजी नगर, धुळे व श्री. नारायण गोटुलाल अग्रवाल, रा. ३२३६ आग्रारोड, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे आशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. १५/११/२०२५

ॲड. रोहित राजकुमार छाबिडया

ब्लॉक नं.आर/२,रुम नं.१, कुमारनगर, साक्री रोड,धुळे.

मो.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे महिंदळे ता. जि.धुळे येथील गट नंबर १०६/२/ड पैकी

१) प्लॉट नं.२२ चे एकूण क्षेत्र ३३६ चौ.मी. बखळ प्लॉट.

यासी चतु:सिमा : -

पुर्वेस : प्लॉट नं.२३ — पश्चिमेस : स. नं. १०६/२क
दक्षिणेस : रस्ता — उत्तरेस : प्लॉट नं. २९

२) प्लॉट नं.२९ चे एकूण क्षेत्र २६२.५० चौ.मी. बखळ प्लॉट.

यासी चतु:सिमा : -

पुर्वेस : प्लॉट नं.२८ — पश्चिमेस : स. नं. १०६/२क व ओपन स्पेस
दक्षिणेस : प्लॉट नं. २२ — उत्तरेस : रस्ता व ओपन स्पेस

येणे प्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक **श्री. गिरीश प्रभुदयाल अग्रवाल** रा. ७, अग्रवाल नगर,मालेगांव रोड,धुळे, श्री. किशोर हरकचंद भंडारी रा. ३५५२ चंपा बाग साक्री रोड,धुळे. श्री. प्रविण महावीर अग्रवाल रा. भाईजी नगर, धुळे व श्री. नारायण गोटुलाल अग्रवाल, रा. ३२३६ आग्रारोड, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे आशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. १५/११/२०२५

ॲड. रोहित राजकुमार छाबिडया

ब्लॉक नं.आर/२,रुम नं.१, कुमारनगर, साक्री रोड,धुळे.

मो.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५

ॲड.हर्षल भा. अहिरराव

जाहीर संमन्स

शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनिअर डिव्हीजन यांचे न्यायालयात

दिवाणी कि.अर्ज नं.४०२/२०२५

श्रीमती.विमलबाई राजधर पाटील वगैरे-१ ..... **अर्जदार**

विरूध्द

कै.राजधर बुधा पाटील ..... **मयत**

वारस दाखला **(Heirship Certificate)** मिळणेसाठी अर्ज

ज्या अर्थी अर्जदार क्र.१) श्रीमती विमलबाई राजधर पाटील ही पत्नी या नात्याने तसेच अर्जदार क्र. २) श्री.खुशाल राजधर निकम हा मुलगा या नात्याने मयत कै.राजधर बुधा पाटील यांचे वारस असल्याने मयताचे मृत्यू पश्चात वारस दाखला मिळणेसाठी अर्ज सादर केलेला आहे. कै.राजधर बुधा पाटील हे मयत असून मयताचे अनुक्रमे अर्जदार क्र १ ते २ हे पत्नी व मुलगा आहे त्याशिवाय दुसरे कोणीही वारस नाही. असे त्याचे कथन आहे. मयत कै.राजधर बुधा पाटील हे दि.०७/०९/२०२२ रोजी मौजे हातनुर ता.शिंदखेडा जि.धुळे येथे मयत झालेल असून मयत कै.राजधर बुधा पाटील यांचे नावाला शासकीय, प्रशासकीय, महसुल तसेच इतर महत्त्वाचे कामासाठी नावे लागणेकामी अर्जदार क्र.१ ते २ हे वारस म्हणून नाव लावण्यासाठी वारस दाखला दाखल केलेला आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस या जाहिर संमन्स द्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जाचे कामी सुनावणी तारीख २२/१२/२०२५ ठेवण्यात आली आहे. तरी या न्यायालयात वरील वारस दाखला देण्याबाबत कोणाची हरकत असल्यास इतर हितसंबंध असल्यास या न्यायालयात दि.२२/१२/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून आपले म्हणणे सादर करावे. वरील तारखेस व वेळी कोणाची हरकत न आल्यास निर्णय देण्यात येईल. मग नंतर काही एक तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर संमन्स नोटीस न्यायालयाचे सही शिक्क्यानिशी दिली असे.

शिंदखेडा, दि.७/११/२०२५

कोर्टाचा शिक्का — **सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, कनिष्ठस्तर शिंदखेडा

ॲड.हर्षल भा. अहिरराव

जाहीर संमन्स

शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनिअर डिव्हीजन यांचे न्यायालयात

दिवाणी कि.अर्ज नं.४०१/२०२५

श्रीमती.मंगलाबाई हिम्मतराव पवार वगैरे-३ ..... **अर्जदार**

विरूध्द

कै.श्री.हिम्मतराव बाबुराव पाटील
रा.पाटण, ता.शिंदखेडा, जि.धुळे. ..... **मयत**

वारस दाखला **(Heirship Certificate)** मिळणेसाठी अर्ज

ज्या अर्थी अर्जदार क्र.१) श्रीमती मंगलाबाई हिम्मतराव पवार ही पत्नी या नात्याने, अर्जदार क्र.२ श्री.प्रमोद हिंमतराव पवार व अर्जदार क्र ४ श्री.ललित हिम्मतराव पाटील हे मुले या नात्याने तसेच अर्जदार क्र.३अ) श्रीमती. उज्वला सयाजी पवार ही सुन या नात्याने, तसेच अर्जदार क्र.३ब) चि.तरुण सयाजी पवार हा नातु या नात्याने, तसेच अर्जदार क्र.३क) कु.आरोही सयाजी पवार ही नात मयत कै.श्री.हिम्मतराव बाबुराव पाटील यांचे वारस असून मयत कै.हिम्मतराव बाबुराव पाटील हे दि.०३/१०/२०२५ रोजी मौजे पाटण येथे मयत झाले असून अर्जदार यांनी मयताचे मृत्यु पश्चात वारस दाखला मिळणेसाठी अर्ज सादर केलेला आहे. मयताचे अनुक्रमे अर्जदार क्र १ ते ४ हे पत्नी, मुले, सुन, नातु व नात आहेत. त्याशिवाय दुसरे कोणीही वारस नाही. असे त्याचे कथन आहे. मयत कै.श्री.हिम्मतराव बाबुराव पाटील हे मौजे शिंदखेडा येथील किसान विदयालय या शाळेत शिपाई या पदावरुन सेवानिवृत्त झालेले असल्याने त्याचे पेन्शन कामी तसेच शासकीय, प्रशासकीय कामासाठी वारसाची नावे लागणेकामी अर्जदार क्र.१ ते ४ हे वारस म्हणून नाव लावण्यासाठी वारस दाखला दाखल केलेला आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस या जाहिर संमन्स द्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जाचे कामी सुनावणी तारीख १७/१२/२०२५ ठेवण्यात आली आहे. तरी या न्यायालयात वरील वारस दाखला देण्याबाबत कोणाची हरकत असल्यास इतर हितसंबंध असल्यास या न्यायालयात दि.१७/१२/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून आपले म्हणणे सादर करावे. वरील तारखेस व वेळी कोणाची हरकत न आल्यास निर्णय देण्यात येईल. मग नंतर काही एक तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर संमन्स नोटीस न्यायालयाचे सही शिक्क्यानिशी दिली असे.

शिंदखेडा, दि.११/११/२०२५

कोर्टाचा शिक्का — **सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, कनिष्ठस्तर शिंदखेडा

चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमांक/२१८४/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, धुळे
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय धुळे,
पिंपालेक कॉम्प्लेक्स, मोगलाई शाळा नं.१४ समोर, साक्री रोड,
धुळे., धुळे, धुळे, धुळे, दि.२६/९/२०२५

एस.आर.एन.क्रमांक - **DHL/19122/1860/25**

फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक- **चौ.अ.क्र.६९७/२५ महा/२३०/२५**

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक सावित्रीबाई महिला विकास मंडळ खर्दे बुा., ता.शिरपूर, जि.धुळे बाबत/
न्यासाचा पत्ता- खर्डे बीके, शिरपूर, धुळे, धुळे, शिरपूर, खर्डे बु.

अर्जदार - कमलाबाई सुनिल बोरसे

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, धुळे हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यायासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

अ.क्र.	तपशील	अंदाजे मूल्य
1	TRUST FUND	3507.00

(अ) जंगम मिळकत : रोख रु.३५०७/- मात्र, (अक्षरी रुपये तीन हजार पाचशे सात मात्र फक्त)

स्थावर मिळकत (वर्णन)

अ. क्र.	शहर किंवा गांव	सी.एस.किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र.	क्षेत्र	मुल्यांकन	मुदत/ कालावधी किंवा स्वरुप	अंदाजे मुल्य

(ब) स्थावर मिळकत : रोख रु. /- मात्र, (अक्षरी : रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २६/०९/२०२५ रोजी दिली.

शिक्का — **अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, धुळे

अर्जदार वकील, ॲड.निलेश व्ही.पवार

जाहीर नोटीस

शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो., यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.३९२/२०२५

१) श्रीमती.लताबाई धुडकू शिंदे, २) श्री.भगवान धुडकू शिंदे,
३) श्री.किशोर धुडकू शिंदे, अर्जदार नं.१ ते ३ रा.मु.पो.२७ विजय नगर शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे,
४) सौ.मनिषा चंद्रकांत पाटील,
रा.मु.पो.चौगाव, बु.ता.शिंदखेडा, जि.धुळे. ..... **अर्जदार**

विरूध्द

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

कै.धुडकू उखा शिंदे, मृत्यू दि.२८/०९/२०२५

ज्याअर्थी अर्जदार यांनी कै.धुडकू उखा शिंदे हे दि.२८/०९/२०२५ रोजी मौजे शिंदखेडा ता.शिंदखेडा जि.धुळे येथे मयत झाले आहे. कै.धुडकू उखा शिंदे हे मयत झाल्यानंतर अर्जदार नं.१ लताबाई धुडकू शिंदे पत्नी ह्या नात्याने अर्जदार नं.२ भगवान धुडकू शिंदे अर्जदार नं.३ किशोर धुडकू शिंदे हे मुले ह्या नात्याने अर्जदार नं.४ मनिषा ही मुलगी ह्या नात्याने कायदेशीर वारस आहेत या शिवाय त्यांना अन्य वारस नाहीत. तसा कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी या मे.न्यायलयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहू मयतास अजून कोणी वारस आहेत किंवा काय? किंवा अर्जदारांनी अर्जात नमूद केलेल्या व्यक्ती मयताचे चे वारस नाहीत असे कोणाचे काहीही म्हणने हरकत/तक्रार असल्यास त्यांनी दि.१६/१२/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता मे.शिंदखेडा न्यायलयात स्वत:अगर वकील प्रतिनिधी मार्फत कागदपत्रासह हजर होवून लेखी हरकती नोंद्व्यात मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास अर्जाची एकतर्फा सुनावणी घेण्यात येवून अर्जदार मयताचे कायदेशीर वारस आहेत असा कायदेशीर वारसांचा दाखला देण्याविषयी वारस प्रमाणपत्र देण्याविषयी पुढील योग्य तो आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे.

सदरहू जाहीर नोटीस मे.न्यायालयाचे आदेशावरून प्रसिद्धीस आपला महाराष्ट्र या वृत्त पत्रात दिली असे. **शिंदखेडा, दि.०६/११/२०२५**

(कामगिरी कारकून) — कोर्टाचा शिक्का — **सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे